# व्यवसायाभिमुख शिक्षण गरजेचे

## दीपक माळी यांचे प्रतिपादन

पुणे : विद्यार्थ्यांनी करिअर करताना धैर्य, चिकाटी, आत्मविश्वास या गोष्टी जोपासल्या पाहिजेत. आयुष्यात कोणतीही गोष्ट अशक्य नसते, नकारार्थी वातावरणाच्या भिंतीची चौकट मोडून बाहेर आले पाहिजे. तुम्हाला ज्या क्षेत्रात रस असेल तेच क्षेत्र करिअर म्हणून निवडा. व्यावसायिक कौशल्य आवश्यक आहे, त्यामुळे व्यवसायाभिमुख शिक्षण घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन दीपक माळी यांनी व्यक्त केले.



- पंख सामाजिक संस्था व क्विकहिल फाऊंडेशनच्या शाळांगण प्रकल्पा अंतर्गत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय आणि रफी अहमद किडवाई उर्दू हायस्कूल येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिक्षणाधिकारी दिपक माळी, क्विकहिल फाउंडेशनचे संचालक कैलास काटकर,अजय शिर्के तसेच दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापिका कर्णे आदी उपस्थित होते.

- पंख संस्थेच्या विश्वस्त कल्याणी भाबड यांनी मुलांना १० वी आणि १२वी नंतरच्या करिअर विषयी मार्गदर्शन केले. उपस्थित विदयार्थ्यांनी देखील त्यांच्या मनातील शंका विचारल्या आणि विविध क्षेत्रातील करिअर विषयी माहिती घेतली. कैलास काटकर म्हणाले की, मुलांना मार्गदर्शन करताना त्यांनी स्वतःचा अनुभव सांगितला, कशा पद्धतीने शालेय जीवनात खडतर परिस्थिती मध्ये राहून आपले शिक्षण पूर्ण केले. तसेच कशाप्रकारे त्यांनी हा पल्ला गाठला हे ऐकून उपस्थित मुले भारावून गेली.